महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८७ वा | दिनांक : ११/०५/२०२५ | वार : सोमवार

# लेंडी प्रकल्पाबाबत अजित पवारांकडून नाराजी व्यक्त



**नांदेड** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रकल्पाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. ऐकोणचाळीस वर्षांपूर्वी लेंडी प्रकल्पाचा नारळ फोडण्यात आला होता. परंतु तो अद्याप पूर्ण होऊ शकला नाही. एखाद्या प्रकल्पाच्या भूमिपूजनाचा नारळ फोडल्यानंतर तो पूर्ण व्हायला चाळीस वर्ष लागतात हे आमच अपयशच म्हणावे लागेल, असे अजित पवार म्हणाले. लवकरच लेंडी प्रकल्पातील अडथळे दूर करुन तो पूर्ण करु, असा विश्वासही त्यांनी दिला.

अजित पवार आज नांदेड दौऱ्यावर होते. या दौऱ्यावेळी मुखेड तालुक्यातील चव्हाण वाडी येथे शेषराव चव्हाण यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी लेंडी प्रकल्पासह मनार धरण, गोदावरी मन्यार साखर कारखाना व इतर रखडलेली प्रकल्प लवकरच पूर्णत्वास नेण्याचे उपस्थितांना आश्वासन दिले.

ऐकोणचाळीस वर्षांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रकल्पाचा नारळ फोडण्यात आला होता. शंकरराव चव्हाण यांच्या काळात याचे भूमिपूजन झाले. परंतु तो अद्याप पूर्ण होऊ शकला नाही. दोन राज्यातील आंतरराज्य असलेला हा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे. एखाद्या प्रकल्पाच्या भूमिपूजनाचा नारळ फोडल्यानंतर तो पूर्ण व्हायला चाळीस वर्ष लागतात हे आमच अपयशच म्हणावे लागेल, असे अजित पवार म्हणाले. महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. लवकरच लेंडी प्रकल्पातील अडथळे दूर करुन तो पूर्ण करु, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

आता आपण या प्रकल्पाचे रखडलेले काम सुरू केले आहे. हे करत असताना अनेकांनी मला निवेदन दिले आहे. पुनर्वसनाचा प्रश्न व इतर जे काही मुलभूत प्रश्न आहेत ते सोडवले जातील. मी अर्थमंत्री आहे, मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस, विखे पाटील यांच्याशी बोलून तुम्हाला मदत करेल, काळजी करू नका. मनारसाठी याच महिन्यात बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल. नारळ फोडल्यानंतर एखाद्या प्रकल्पाला चाळीस वर्ष लागतात हे आमचे अपयशच आहे. गोदावरी पुनर्भरण आणि मराठवाडा वॉटर ग्रीडच्या माध्यमातून पाणी आणण्याची योजना आपण राबवतोय. ५४ टीएमसी पाणी आणून २ लाख ४० हजार हेक्टर भागाला याचा लाभ होईल, असेही अजित पवार यांनी सांगितले.

# पाकिस्तान लष्कराची पत्रकार परिषद



**इस्लामाबाद** : पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी आज म्हणजेच रविवारी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, भारताला माहित नाही का की आपण एक अणुशक्ती आहोत. पाकिस्तान स्वसंरक्षणार्थ हल्ला करतो. पाकिस्तानला त्याचे हक्क समजतात.

चौधरी म्हणाले की, भारतीय सैन्य स्वप्न पाहत आहे, की ते पाकिस्तानी सैन्याला पराभूत करू शकतात. भारताला योग्य उत्तर दिले जाईल. पाकिस्तानी सैन्य आणि जनता पूर्णपणे तयार आहे.

पाकिस्तान आज भारताविरुद्धच्या ऑपरेशन बनायन-उम-मर्सूसचा यूम-ए-तशक्कूर (धन्यवाद दिन) साजरा करत आहे.

चार दिवसांच्या संघर्षानंतर काल भारत आणि पाकिस्तानी सैन्यात युद्धबंदी जाहीर करण्यात आली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्विट करून याबद्दलची माहिती सर्वप्रथम दिली.

शनिवारी संध्याकाळी 5:30 वाजता युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर तीन तासांनी, भारताने युद्धबंदीचे उल्लंघन केल्याचा दावा पाकिस्तानने केला. पाकिस्तानचा दावा आहे की, हवाई संरक्षण यंत्रणेने पेशावर विमानतळाजवळ भारतीय ड्रोन पाडले.

पेशावरमध्ये ड्रोन दिसताच हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय करण्यात आली. काही लोकांना अँटी एअरक्राफ्ट गन फायरिंगचा आवाज ऐकू आला.

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी शनिवारी सांगितले होते की, पाकिस्तान युद्धबंदीचे पालन करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे. भारत काही भागात युद्धबंदीचे उल्लंघन करत आहे, परंतु आमचे सैनिक जबाबदारीने आणि संयमाने परिस्थिती हाताळत आहेत.

अधिकारी पातळीवर परस्पर संवादाद्वारे युद्धबंदीची अंमलबजावणी व्हावी असे आमचे मत आहे. तर युद्धाच्या परिस्थितीत उपस्थित असलेल्या सैनिकांनी संयम बाळगला पाहिजे.

युद्धबंदीनंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी राष्ट्राला संबोधित केले. यावेळी त्यांनी सांगितले की, भारताने हल्ला करून जी चूक केली, त्याचे परिणाम त्यांना निश्चितच भोगावे लागतील. काल रात्री संपूर्ण जगाने पाहिले की, आपल्या सैन्याने आपल्यापेक्षा कितीतरी पटीने शक्तिशाली असलेल्या शत्रूला शरणागती पत्करण्यास भाग पाडले.

त्यांनी असा दावा केला की, पाकिस्तानी सैन्य आणि लढाऊ विमानांनी काही तासांत भारतीय सैन्याच्या तोफा कशा शांत केल्या हे इतिहास नेहमीच लक्षात ठेवेल. आपल्या 12 मिनिटांच्या भाषणात शरीफ यांनी भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष थांबवल्याबद्दल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आभार मानले.

# देवगिरी साखर कारखाना दसऱ्याला आता पुन्हा १४ वर्षांनंतर सुरू होणार

**फुलंब्री** : देवगिरी सहकारी साखर कारखाना दसऱ्याला पुन्हा सुरू होणार आहे. उसाची मुळे टाकून शुभारंभ होईल, अशी माहिती मुख्य अभियंता अतुल चव्हाण आणि आमदार अनुराधा चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही पत्रकार परिषद शनिवारी झाली.

गेल्या 14 वर्षांपासून हा कारखाना बंद होता. विधानसभा निवडणुकीत आमदार अनुराधा चव्हाण यांनी कारखाना सुरू करण्याचे वचन दिले होते. हे वचन पूर्ण करण्यासाठी त्यांनी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश आले असून दसऱ्याला कारखान्याचा बॉयलर पेटणार आहे.या वेळी मुख्य अभियंता अतुल चव्हाण, आमदार अनुराधा चव्हाण, शिवाजी पाथ्रीकर, राहुल डकले, सर्जेराव मेटे, विजय मोरे आणि संतोष तांदळे उपस्थित होते. कारखाना सुरू करण्यासाठी सुरुवातीला प्रशासक हटवून संचालक मंडळाची निवड झाली. कल्याण चव्हाण, नितीन देशमुख आणि योगेश मिसाळ यांची संचालक म्हणून निवड झाली आहे.मागील कामगारांचे थकीत पगार आणि व्याजासह सर्व रक्कम देण्यात आली आहे. काही कामगारांचा मृत्यू झाला. काही वयोवृद्ध झाले आहेत. आता पारदर्शक पद्धतीने योग्य कामगार घेऊन कारखाना सुरू केला जाणार आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.

कारखाना सुरू असताना फुलंब्री शहरात मोठी वर्दळ होती. कामगारांचे पगार शहरातील दुकानांमध्ये खर्च होत होते. त्यामुळे बाजारपेठेला चालना मिळत होती. कारखाना बंद झाल्यानंतर याचा परिणाम शहरावर झाला. विकासकामे थांबली. तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी कारखाना सुरू होण्याची वाट पाहत होते. आता कारखाना सुरू झाल्यावर फुलंब्री तालुक्याला पुन्हा गतवैभव मिळणार आहे.

1990 साली कारखाना सुरू, गाळप 1993 साली फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांना ऊस देण्यासाठी सिल्लोड येथील सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यावर अवलंबून होते. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना ऊस नेण्यासाठी खूप अडचण येत होती. आडसाल्या ऊस (दुसऱ्या वर्षी नेण्यात येत होता) हीच अडचण ओळखून डॉ. नामदेव गाडेकर यांनी फुलंब्री तालुक्यात कारखाना पाहीजेत यासाठी धडपड करत हा कारखाना 1990 मध्ये हा कारखाना सुरू करण्याची मुहूर्त मेड रोवली. 1993 साली पाहिल्या गळीत हंगामाला सुरवात झाली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ मे २०२५


## अतनुर ता. जळकोट येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. म्हणून या भूमीला खऱ्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच माध्यमातून हा वारकरी संप्रदाय खऱ्या अर्थाने संपूर्ण जगभरात पोहोचायला मदत झाली. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव यांच्यासोबतच अनेक संतांनी आपल्या अभंगातून, निरुपणातून समाजाला एक सकारात्मक दिशा देण्याच काम केलं. अतनुर येथे श्री संजीवन समाधी असलेले घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या नांवाने हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संजीवन समाधी म्हणजे एका व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने, खोल ध्यान अवस्थेत प्रवेश करून, आपल्या शारीरिक देहाचा त्याग करणे. याला अनेकदा 'जिवंत समाधी' देखील म्हटले जाते, कारण व्यक्ती जिवंत असतानाच या अवस्थेत प्रवेश करतो. संजीवन समाधी घेणाऱ्या व्यक्तीचा आत्मा आणि शरीर हे एका विशिष्ट स्थितीत प्रवेश करतात, जिथे ते पूर्णपणे विलीन होतात. संजीवन समाधी घेतलेले श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांची १४९ वी पुण्यतीथी साजरी करण्यात आली. ज्या घाळेप्पा स्वामी महाराज जिवंत समाधी घेतल्यानंतर पुर्ण एक वर्षानंतर समाधी काढण्यात आली तेव्हा त्यांचा डावा डोळा ऊघडा होता. तसेच समाधी घेते वेळी लावलेला दिवा एक वर्षानंतही तेवत होता. यावरुन संजिवन समाधिस्थ श्री घाळेप्पा स्वामी महाराजांचे देवत्व सिध्द होते. यामुळेच अतनूर पंचक्रोशी मधे श्री घाळेप्पा स्वामी महाराजाचे संतत्व आहे. महाराज नवसाला पावणारे,संकट समयी भक्ताला मदत करणारे अशी गाढ श्रद्धा आहे. महाराजाचा पुजनीय वार सोमवार आहे.श्रावण महिन्यात श्री घाळैप्पा स्वामी महाराज फक्त बेलपञी खाऊनच अनुष्ठाण करत असत म्हणुनच की काय महाराजाना दुध साखरेचा नैवेद किंवा दुधातील दशमीचा नैवैद दाखवला जातो.वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे. यामध्ये सात दिवस विविध प्रकारचे संत वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या हरिभक्त परायण महाराजांकडून संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकाराम पर्यंत विविध संतांच्या रचना असलेल्या अभंगावर तत्वचिंतन मांडण्यात येते. ज्याद्वारे मनुष्य जन्मात ईश्वर नामाचे विशद केले जाते.वैशाख प्रतिपदा १ ते वैशाख शुद्ध सप्तमी पर्यत अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप सोमवारी नवनाथ महाराज डोंगरशैळकीकर महाराजाच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आला.जळकोट तालुक्यातील अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हजारो जनसागराच्या साक्षीने भक्तिमय वातावरणात झाली. अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात गेली सात दिवस सुरू होता. या सात दिवसांमध्ये दररोज भजन व पहाटे पाच वाजता काकड आरती होत होती. या सप्ताहाची बुधवारी ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीची गावात पायी दिंडी व शोभायात्रा काढण्यात आली. पायी दिंडी व शोभायात्रा मुख्य बाजार रस्त्यावरुन अंबाबाई मंदीर मार्गे बस स्टँड मार्गे पाटलाच्या ईनामातुन कुंभार गल्ली,शाळेच्या मैदान अशी परिक्रमा करून भजनी मंडळीच्या हरिनामाच्या गजरात ढोल ताशाच्या निनादात व फटाक्याच्या आतिषबाजीत संपूर्ण गावातफिरून पायी दिंडी व शोभायात्रा परत शेवटी श्री काशी विश्र वनाथ महाराज व संजीवन समाधी श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या पवित्र देवस्थान असणाऱ्या मंदिरात आली. पायी दिंडी व शोभायात्रा निघाली असता यात बालगोपालांसह टाळकरी महिला पुरुषांनी टाळमृदुंगाच्या आवाजावर फुगडीचा ठेका धरला. ज्ञानदेव तुकाराम च्या गजरात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता. सात दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प. श्री नवनाथ महाराज डोंगरशेळकीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. व नंतर लगेच अन्नदाते केशव पाटील,सुर्यकांत पांचाळ व प्रा.शशिकांत बिचकुंदे यांच्या कडुन ठेवण्यात आलेल्या महाप्रसादाला सुरुवात झाली. या महाप्रसादाचा लाभ अतनुर परिसरातील हजारो भाविक भक्तांनी घेतला. अशाप्रकारे गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या सप्ताहाच्या सांगतेने शहर हरिनामाच्या गजरात, ढोलताशांच्या व फटाक्यांच्या अतिषबाजीने अक्षरक्षः दुमदुमले होते.या सप्ताहचे वैशिष्ट म्हणजे मंदिरासाठी मंदिराशेजारीच खाजगी खुली जागा खरेदी करण्यात आली. त्यामुळे भक्ताकडुन पंचकमिटीचे कौतुक होत आहे.या सप्ताह यशस्वितेसाठी कमिटी अध्यक्ष विकास सोमुसे,ऊपाध्यक्ष गोविंद पाटील येवरे,हभप दयानंद स्वामी,प्रकाश पोलीस पाटील,चंद्रकांत जोशी गुरुजी,नामदेव कोकणे,माधव सोमूसे,सुर्यकांत पांचाळ,किसन मुगदळे,नामदेव कोकणे,चंद्रकांत जोशी,खजिनदार बाबु पंचगल्ले गुरूजी,माणिक सांळुके.,दिलीप कोकणे,प्रमोद संगेवार,बाळु कोडगीरे,अशोक पाटील माजी सभापती कृषी ऊत्पन्न बाजार समिती,ऊदगीर,मारुती गुंडीले,श्रीधर पाटील गव्हाणे,श्रीमती मन्याबाई मधुकर पत्तेवार,पञकार संजय शिदे या सर्वांनी सप्ताह यशस्वी पार पाडण्यासाठी गेली दोन महिने मोलाचे योगदान व सहकार्य केले . मंदिरावर पुजेची व्यवस्थापक म्हणुन बाबु कदम, बाबु साकोळकर,गुरुनाथ कापसे यांनी मोलाचे सहकार्य केले.तसेच अन्य काही मंडळीनी आपल्या दिलेली जबाबदारी चोख पार पाडली म्हणुन श्री काशी विश्र वनाथल महाराज मंदिर संमिती तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला

## युद्धजंन्य परिस्थितीत देशसेवेसाठी तरुण-तरुणींचा पडेगाव येथिल भारत करियर अकॅडमीत वाढत आहे ओढा



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** पाकिस्तान युद्ध प्रसंगी भारतीय सैन्य व अन्य दलात भर्ती होण्यासाठी अनेक तरुण व युवती मोठया प्रमाणात प्रेरित होत आहे. त्यानुषंगाने भारत कॅरियर अकॅडमी च्या वतीने मोफत तयारी म्हणून सैन्यदल भरती प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.या परीक्षेत किमान दोनशे पन्नास तरुण- तरुणीणी प्रवेश पात्रता परीक्षा दिली.व भारत - पाकिस्तान युद्धात वीरमरण आलेल्या सैनिक व अधिकऱ्यांना भावपुष्प अर्पण करत भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी भारत अकॅडमीचे संचालक बाळासाहेब घुगे, अमोल कवडे, समाधान सुरडकर, शेख जावेद, प्रा.शिवाजी गायकवाड,शिक्षक शुभम बोडखे, शुभम आल्हड, करण वाकेकर,प्रथमेश बोडखे आदींची उपस्थिती होती. सैन्य दलात भार्ती होण्यासाठी खुली प्रतिकात्मक प्रवेश परीक्षा घेण्यात आली. दिवसेंदिवस भारतीय सैन्य दल, एन डि ए, सीडीएस,पोलीस सेवेत भर्ती होण्यासाठी अकॅडमीत तरुण तरुणी मोठया संख्येने विचारणा करत असल्याचे अकॅडमीचे संचालक बाळासाहेब घुगे यांनी सांगितलं आहे.

## सारथीच्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी ३०० कोटींच्या फेलोशिपला मंजुरी - डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या पाठपुराव्यास यश



**मुंबई (प्रतिनीधी)** संशोधन करणाऱ्या मराठा, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी विद्यार्थ्यांना सारथीकडून फेलोशिप दिली जाते. परंतु निधी अभावी ४८० विद्यार्थ्यांना तीन वर्षांपासून फेलोशिप मिळत नव्हती. या बाबत सातत्याने सारथी संस्था व राज्य शासनाकडे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पाठपुरावा केला मुळे संशोधक विद्यार्थी वर्गास न्याय मिळाला आहे.सारथी अंतर्गत पीएचडी फेलोशिप साठी वर्ष २०२२-२३ मध्ये ९६९ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता. या विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांका पासून फेलोशिप देण्याचा निर्णय शासनाच्या वतीने तात्काळ घ्यावा अशी मागणी डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केलेली होती त्या नंतर ९६९ विद्यार्थ्यांपैकी ८१० विद्यार्थ्यांनी सहामाही प्रगती अहवाल सादर करीत संशोधनकार्य सुरु केले. मात्र केवळ ३२४ विद्यार्थ्यांची अधि छात्रवृत्ती जमा करण्यात आल्याचे त्यांनी शासनाच्या व सारथीच्या लक्षात आणुन दिली होते त्यामुळे ४८० विद्यार्थ्यांना अजूनही फेलोशिप न मिळाल्याने त्यांचे संशोधनकार्य पूर्ण होण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या.यावर सारथी साठी वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.तसेच संशोधनकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्वरित अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी सारथी प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे मागील ३ वर्षांपासून फेलोशिप मिळण्या च्या प्रतीक्षेत असलेल्या जवळपास ४८० मराठा विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असुन सर्व स्तरातून डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे न्याय मिळवुन दिल्या बद्दल आभार मानण्यात येत आहे.सारथी प्रशासन कार्यकारी संचालक निंबाळकर सर्व संचालक मंडळ प्रकल्प संचालक देशमुख यांचे सुद्धा सहकार्य केल्या बद्दल आभार व्यक्त करण्यात येत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ मे २०२५


## एनसीसी व करिअर कट्ट्याच्या जलदूत विद्यार्थ्यांनी घेतले जलतारा खड्ड्याचे प्रशिक्षण



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात जलसाक्षरता कक्षाच्या वतीने तसेच एनसीसी आणि करिअर कट्टा विभागाच्या सहकार्याने जलतारा प्रकल्पा अंतर्गत जलतरा खड्डा चे प्रशिक्षण जलदूत विद्यार्थ्यांना देण्यात आले. जलतारा जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न झाली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांना जलतारा खड्डा आपल्या गावामध्ये, घरामध्ये, शेतामध्ये घेता यावा. यासाठी महाविद्यालयाच्या वतीने प्रत्यक्ष जलतारा खड्ड्याचे प्रशिक्षण देण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी जलतारा खड्डा कसा असावा. याचे मार्गदर्शन केले. यावेळी आपल्या मार्गदर्शनात त्यांनी "जलतारा खड्डा" घेण्याची प्रक्रिया मृद व जलसंधारणासाठी वापरली जाते. हा खड्डा पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी उपयोगी ठरतो. जिथे पावसाचे पाणी साचते किंवा वाहते असे ठिकाण निवडावे, झाडांजवळ किंवा बागेत केल्यास अधिक फायदेशीर. सामान्यत: 5 फूट लांब, 5 फूट रुंद आणि 6 फूट खोल खड्डा घ्यावा. गरजेनुसार मोठा खड्डा देखील घेता येतो. सर्वात खाली मोठे दगड (2 फूट), त्यावर मध्यम आकाराचे गोटे (2 फूट), त्यावर गिट्टी/वाळू (2 फूट), सर्वात वर थोडीशी वाळू व माती असावी. वर्षातून एकदा खड्ड्याची साफसफाई करा.गाळ साचल्यास वरचा थर काढून पुन्हा भरावा. यामुळे भूगर्भ जलपातळी वाढवण्यासाठी व पाण्याचा साठा टिकवण्यासाठी उपयुक्त आहे.पावसाचे पाणी वाया न जाता परिसरातून वाहणारे पाणी खड्ड्यात मुरवल्यास पाणी साठवणूक होते. विहीर, हँडपंप किंवा बोअरवेल यांची जलपातळी हळूहळू वाढते. झाडांना नैसर्गिकरीत्या पाणी मिळाल्यामुळे गाव/कॉलेज ग्रीन कॅम्पस बनतो. असे प्रतिपादन करताना विद्यार्थ्यांनी प्रत्येक गावांमध्ये जनजागृती करावी आणि पाण्याची समस्या सोडवण्यास पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी दगडाच तिन्ही स्तर टाकून खड्डा तयार केला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, प्रबंधक राजकुमार सोनवणे, श्री एस एस जगताप, करिअर कट्टा आणि एनसीसीचे विद्यार्थी जलदूत उपस्थित होते.

## चीत मै जिता पट तुहारा एकच पंप सुरू किमान तीन पंप सुरू केल्या शिवाय पाणी पुरवठा सुधारणार नाही जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील




**प्रतिनीधी** : भविष्यात नागरिकांचा जीव घेणार नियम म्हणजे पाणी पुरवठा उपविधी २०११ कायम स्वरुपी रद्द करण्याची घोषणा प्रशासन का बरे करत नाही ? पाणी पट्टी वाढविण्याचा छुपा डाव कोणासाठी आखला आहे ? त्यावर प्रशासन बोलत नाही ना पाणी मीटर बसवण्याचा मनसुबा कोणा साठी रचला गेला आहे हे पण प्रशासन सांगत नाही ? हे असे का ? ५० हजार लिटर ते ०१ लाख लिटर क्षमतेचा "सर्ज टँक " उभे करावे लागणार आहे त्यावर सुद्धा प्रशासन मूग गिळुन बसले आहे.कॉफर डॅम चे अंतिम नियोजन काय आहे ते जाहीर करा,जायकवाडी ते शेवटच्या पाणी वापरणाऱ्या ग्राहका पर्यंत टाकण्यात येणाऱ्या प्रत्येक व्यासाच्या पाईपची हायड्रॉलिक तपासणी होणार आहे की नाही ? हे प्रशासना कडून स्पष्ट का होत नाही ? हे सर्व होण्या आधीच कंत्राट दाराचे देयके देण्याची घाई प्रशासन का करत आहे ? यावर सुद्धा प्रशासनाने बोलले पाहिजे ? शहराच्या पाणी पुरवठ्या बाबत गांधी भवन समर्थनगर येथे जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज च्या वतीने आयोजीत भव्य पत्रकार परिषदेत अध्यक्ष जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील अनेक बाबी उजागर केल्या आहेत.या पत्रकार परिषदेस प्रा.मनोहर लोंढे, प्रा.डॉ.मच्छिंद्र गोर्डे,विजय (गुड्डू )निकाळजे,अमित वाहुळ आदी उपस्थित होते. १७ हजार पेक्षा जास्त पाणीपट्टी टप्या टप्प्याने नागरीकांना भरावी लागणार होती. मनपा प्रशासनाने आता तरी सर्व सत्यता नागरिकांची समोर आणली पाहीजे.छत्रपती संभाजीनगर शहरासाठी नवीन पाणी पुरवठा योजना साठी केंद्राने ४५ टक्के राज्याने २५ टक्के असे मिळुन ७० टक्के तर मनपाचा हिस्सा ३० टक्के असणार आहे. आमच्या प्रयत्नामुळे रू.२०२५ आहे. २०१४ या वर्षा पर्यंत वर्षाला पाणीपट्टी साधारणता १८०० रुपये एवढी होती. समांतर योजने साठी राज्य शासनाने पाणी पुरवठा उपविधी अंमलात आणली यातील नियमा प्रमाणे पाणी करत साधारणता प्रति वर्षी वर्षी दहा टक्के वाढ केली जाऊ लागली. आम्ही स्वतः खुप ओरड केली आंदोलन केली तेव्हा शब्दछल करून प्रतिवर्ष १०% ऐवजी दर तीन वर्षाला २५ % वाढ असे ठराव मनपात घेतला गेला तत्कालीन पालक मंत्री श्री सुभाष देसाई यांना आमचे शिष्य मंडळ भेटले व वस्तू स्थिती सांगितल्यावर योजना पुर्ण होई पर्यंत सरसगट ५०% कमी करून २०२५ रुपये पाणी पट्टी घेण्याचे ठरले जे आज तगायत आहे. पण योजना पुर्ण झाली की मूळ ४,०५० रुपयांवर १०% मीटर सुरूच राहणार आहे. त्यातील तरतुदी बेमालूम पणे घुसल्या गेल्या असुन ही पाणी पट्टी नसुन पुरविणाऱ्या सेवेसाठी प्रतिवर्षाचा कर आहे असे सांगितले आहे. म्हणून जनहितार्थ प्रमुख मागण्या राज्य शासनाने त्यांची पाणी पुरवठा उपविधी २०११ तात्काळ रद्द करावी- ४०५० रू.पाणी पट्टी ही योजना कार्यान्वित होताच सुरू करणार असुन पाणी मिटर लावणे असा छुपा डाव तात्काळ जनहितार्थ रद्द करावा-छुपा अजेंडा जोअक्षरशःउघडा पडला आहे त्याच्या अंमल बजावणीचा विचार सोडुन द्यावा- मार्गस्थ ग्राहकांना शहर वासीयांच्या पाण्यामधुन सर्रास पाणी दिल्या जाते ते तात्काळ बंद करावे- शासनाने नियुक्त करावयाच्या जागेवर मनपाचा अभियंता नियुक्त करू नये.विद्युत पुरवठा खंडित झाल्यास पाण्याचा दाब नियंत्रित ठेवण्यासाठी २५०० मिमी व्यासाची जलवाहीनी फुटल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे त्यासाठी सर्ज टँक उभे करावेत. मनपास स्व:हिस्सा भरण्यासाठी ८२२ कोटी २२ लाख रूपये द्यायचा आहे. पुढे बोलतांना ते म्हणाले की,तो एचडीसी कडून कर्ज रूपाने देण्याचा शासनाचा मानस असुन हे कर्ज परतावा किमान बीन व्याजी ०५ वर्षानंतर परतफेड करायची सवलत द्यावी. शहरात साधारणतः १९०० कि.मी.पाईप लाईन टाकावी लागणार असुन सद्यस्थितीत फक्त १०८० कि.मी.काम दृष्टी क्षेपात असुन पुढील काळात ८००कि.मी पेक्षा ही जास्त पाईप लाईन टाकावी लागणार आहे त्याचे नियोजन जनहितार्थ तात्काळ जाहीर करावे.-नविन बांधावयाच्या ५६ टाक्या पैकी केवळ 3 टाक्या हस्तांतरित झाल्या असुन काही टाक्यांच्या कामांना स्थगिती देण्यात आलेली असुन यासर्व बाबींचा खुलासा करावा-फक्त 3 टाक्यांच्या भरोशावर ३२ लाख लोकांना पाणी कसे पुरविल्या जाईल ? हा महत्वाचा खुलासा प्रशासनाने तात्काळ करावा. सद्य परिस्थितीचे अवलोकन करता केवळ २८ टाक्यांचे काम पिलर व स्लॅब या मर्यादे पर्यंत आलेले असुन १६८० कोटींची राज्य शासनाने मंजूर केलेल्या योजनेची किंमत होती.या योजनेसाठी वाढलेल्या १६० कोटीं बाबत डोके दु:खी वाढली त्याचे नियोजन जनहितार्थ जाहीर करा,पहिल्या टप्प्या मधील कामांत समाविष्ट असलेले ." जॅकवेल " चे काम पूर्णत्वास गेल्या शिवाय या योजने तील दुसऱ्या टप्प्यातील कामांना सुरवात होऊ शकत नाही ते कसे याचा जनहितार्थ खुलासा व्हावा-गेली अनेक वर्ष आमची मागणी असुन एक सखोल चौकशी करणारी उच्चाधिकार चौकशी समिती नेमावी (एचपीसी ) व दोषीवर तात्काळ कारवाई करावी अशी ही मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र अध्यक्ष आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज च्या वतीने आयोजीत भव्य पत्रकार परिषदेत अध्यक्ष जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे. पुढे ते म्हणाले की वरील प्रमुख त्रुटी कोणी निर्माण केली ती जवाबदारी निश्चीत करावी अशीही मागणी त्यांनी केली आहे. आता पाणी पुरवठा नियोजन करता येईल काय ? अगदी जायकवाडी पासुन पाईप लाईन नागमोडी टाकली आहे.ती सरळ करून नाही घेतली तर पाण्याच्या दबावा मुळे सतत पाईप लाईन फुटत राहील व पाणीपुरवठा नियोजन करणे अत्यंत जिकिरीचे होणार आहे चुकीच्या पाईप लाईन अंथरल्या गेल्यास भविष्यात हा सततचा त्रास मनपास होणार असुन तांत्रीक दृष्ट्या अयोग्य अंथरलेली पाईप लाईन ताब्यात घेण्याची जनविरोधी कारवाई मनपाने करू नये.या जलवाहिन्या भविष्यात फुटत राहिली तर त्यावेळी मनपाचे जे अभियंते काम करतील त्यांना सस्पेंड व्हायची वेळ येईल आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पूर्ण करून निघून जाईल. २५०० एमएमची पाईप लाईनचे काम संपुर्ण पणे संपून ती समाधानकारक टेस्टींग नंतर पूर्णतः सुरू होत नाही तो पर्यंत तात्पुरती पाणी पुरवठा व्यवस्था म्हणुन ९०० एम एम च्या लाईनचा पर्याय आम्ही स्वतः पुढे आणला होता व त्यासाठी आवश्यक असणारा निधी मिळावा म्हणुन सतत पाठपुरावा आम्ही केल्याचे सर्वश्रुत आहे त्यामुळे ९०० एम एम ची लाईन तांत्रीक दृष्ट्या अधिक सक्षम करून घेणे अत्यावश्यक आहे.यात आज पर्यंत वॉटर ट्रीटमेंट प्लांट अद्यापही संपलेले नाही. वास्तावीक पाहता ९०० एम एम लाईन मधुन ७५ एम एल डी पाणी पुरवठा होणे अपेक्षित असुन त्यासाठी घेते ? याचे उत्तर कोण देणार ? एकच मोटार बसवलेली आहे आणि आश्चर्य म्हणजे या मोटारीवर मीटरच नाही. मग पाणी किती येते याचे मोजमाप मनपा कसे करणार ? आता या सगळ्याच लाईनचे गौड बंगाल असे आहे की, जुनी ७०० एम एम लाईन आणि जुनी १२०० एम एम लाईन ला चिकटून ही पाईप लाईन अगदी नागमोडी टाकली जात असल्याने ती एक तर सरळ रेषेत अलाईनमेंट नाही आणि म्हणुन पाण्याच्या दबावा मुळे ती लाईन सतत फुटणार आहे. याची जवाबदारी कोणाची असेल ? हे सुद्धा निश्चीत करणे गरजेचे आहे. जुन्या ७०० एम एम लाईन आणि जुन्या १२०० एम एम लाईन मधुन फक्त १२५ एम एल डी पाणी मिळते आणि आमच्या सूचनेवर गांभीर्याने कारवाई केल्यास १२५ अधिक ७५ एम एल डी असे किमान २०० एम एल डी पाणी मिळू शकते त्यात सद्य स्थितित मुख्य तांत्रीक अडचण ही आहे की, येऊ घातलेले हे पाणी कुठे साठवणार ? शेवटच्या नळ धारक ग्राहकास ते मनपा कसे पुरवणार ? याचे मनपा कडे उत्तरच नाही ? सगळा ढिसाळ कारभार सुरु आहे. काही एक नियोजन नाही. फिल्टर टँक म्हणजे जल शुद्धीकरण तात्काळ सुरु करून तिन्ही पंप चालु केल्या शिवाय पर्याय नाही अशीही मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र चे अध्यक्ष आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या भव्य पत्रकार परिषदेत केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ मे २०२५

# उपचारात्मक जगणाऱ्या माणसांच्या गोष्टींचा दस्तऐवज : हिलिंग इज लिविंग-१



समकालीन जगण्याचे मर्म सांगणारा 'हिलिंग इज लिविंग-१' हा अलीकडेच एक छान इंग्रजी भाषेतील लघुकथांचा संग्रह वाचनात आला. हा संग्रह पुणे येथील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका डॉ.संगीता घोडके यांनी लिहिलेला असून वैशाली पब्लिकेशन, पुणे यांच्याकडून प्रकाशित करण्यात आलेला आहे. या संग्रहात वाचकाला पदोपदी 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' हे संत रामदासांचे शब्द आठवतात. लेखिका पुढे जाऊन 'संघर्ष म्हणजेच जीवन' अर्थात 'लढणे म्हणजे जगणे' असे प्रत्येक कथेतून सांगण्याचा प्रयत्न करतात. आजच्या वास्तवात दैनंदिन जीवनातील असंख्य समस्यांना, प्रश्नांना कंटाळलेल्या माणसाच्या हृदयाला जखमा होणारच पण काळाच्या ओघात त्या भरूनही येणार आहेत. हे आजचा माणूस विसरत चालला आहे. त्यामुळे 'टाइम इज ग्रेट हिलर' हे वाचकाला संपूर्ण कथांमधून प्रकर्षाने जाणवत राहते. या कथांमध्ये जसे प्रश्न आहेत तसे उत्तरही असतीलच. त्यासाठी काही कथांचा थोडक्यात परामर्श पाहूया..!पहिली कथा 'हिलींग इज लिविंग' ही एका अत्यंत हुशार मुलाची गोष्ट आहे. यामध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेत असताना डीप्रेसिव्ह सायकोसिसने आजारी पडतो आणि शेवटच्या सेमिस्टरचे पेपर्स देऊ शकत नाही. कथानायकाबरोबर त्याची एकमेव पालक असलेली त्याच्या आईची अत्यंत हृदयस्पर्शी फरपट ही कथा अधोरेखित करते. अर्थात हेच जगणं आहे असा अनुभव ही कथा वाचकाला देते. 'स्टिच इन टाईम' ही कथा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय हाताळते आणि एका तरुण शेतकऱ्याचा जीव त्याला कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढून त्याचा मित्र कसा वाचवितो हे सांगते. 'जिमी' नावाच्या कुत्र्याचे माणसाबरोबर असलेले भावविश्व उलगडते. कोरोना काळात एक कुत्र्याचे पिल्लू एक कामगार सांभाळतो आणि लॉकडाऊन मध्ये घरी निघून जातो. तीन वर्षांनी तो परत आल्यावर जिमी अत्यंत आजारी असतो; पण त्याच्या मालकाला पाहिल्यावर मगच तो त्याच्या मांडीवर आपले प्राण सोडतो. 'माणसाचे व्यवहारी जग आणि प्राण्यांचे निर्व्याज प्रेम' हा विषय या कथेतून प्रभावीपणे रेखाटलेला आहे. 'द विल' ही कथा एका अण्णा नावाच्या वृद्ध गृहस्थाची कथा आहे. हा वृद्ध कथा नायक आपली मालमत्ता फक्त पोटच्या मुलांना न देता ती त्याच्या शेतावर काम करणाऱ्या नोकराला, गावातील देवळाच्या जिर्णोद्धाराला, ज्युनियर कॉलेजसाठी काही फंड आणि हायवे लगतचा प्लॉट गावामध्ये सुसज्ज हॉस्पिटलसाठी देतो. हे आजच्या समाजाला शिकवण देणारे सुज्ञपण या कथेत लेखिका सांगण्याचा प्रयत्न करतात. 'हीटिंग ए होम रण' ही एका महिला शास्त्रज्ञाची यशोगाथा आहे. कोरोनादरम्यान कोणत्याही परिस्थितीत लस शोधून काढण्यासाठी दिवस रात्र झपाटून काम करते. शेवटी त्यात यशस्वी होते आणि शांततेचे नोबेलही पटकावते. आजच्या पिढीसाठी ही खूपच प्रेरणादायी आणि दुर्दम्य अशावादाचे प्रतीक असणारी कथा आहे. 'सर्कमसीशन' ही तरुण वयात येणाऱ्या मुलांवर केल्या जाणाऱ्या शारीरिक शस्त्रक्रियेविषयी आणि त्यातून उद्भवणाऱ्या गुंतागुंतीवर भाष्य करणारी नाविन्यपूर्ण आशय घेऊन वाचकाच्या भेटीला आलेली कथा आहे. अभया नावाची आफ्रिकन मुलगी आपले नाते आपल्या मातीशी जोडण्यासाठी ही शस्त्रक्रिया करते आणि जंतुसंसर्गमुळे मृत्यू पावते. भविष्यामध्ये आपल्यासारखे मृत्यू होऊ नयेत म्हणून ती भूत बनू आदिवासी लोकांचे मन परिवर्तन आणि हृदय परिवर्तन करते आणि प्रथा-परंपरा महत्त्वाच्या असतात; पण स्वच्छता ही तितकीच महत्त्वाची असते. असा दुहेरी आशय व्यक्त करते. 'बेस्ट बडीज' ही चार शाळेपासूनच्या मैत्रिणी असलेल्या आणि नंतर कॉर्पोरेट वर्ल्डमध्ये काम करणाऱ्या मुलींची कथा आहे. युरोप ट्रीप दरम्यान भेट झाल्यानंतर एकमेकींच्या वैयक्तिक आयुष्यामध्ये आणि वैवाहिक जीवनामध्ये सुरू असलेल्या कुरबुरीविषयी त्या चर्चा करतात. मात्र परतीच्या प्रवासामध्ये प्रत्येकीला समजते की, कुटुंबाशिवाय आपल्या पदाला आणि मानमर्तबाला काहीही अर्थ उरत नाही. अर्थात तडजोडीशिवाय जीवन नाही? हा मूलमंत्र घेऊन त्या परततात. म्हणून भारतीय विवाह संस्थाव कुटुंबव्यवस्था कशी महत्त्वाची आहे. असा आशय ही कथा प्रकट करते. 'न्यू डॉन' ही एका प्रतीथयश क्रिकेटरची गोष्ट आहे. अनावधानाने एका छोट्याशा अपघातात एक वृद्ध प्राण गमावतात आणि या क्रिकेटरला तुरुंगवास भोगावला लागतो. मनुष्य स्वभावाचे खरे दर्शन त्याला तुरुंगामध्ये होते आणि संपूर्ण हृदय परिवर्तन होऊन अध्यात्माची कास धरून हा परत पुन्हा नवीन जन्म घेतो. अत्यंत प्रभावी मांडणी आणि प्रेरणादायी आशय घेऊन ही कथा वाचकांच्या भेटीला येते. 'लर्नेड' एका स्वतःला अत्यंत उच्चविद्या विभूषित समजणाऱ्या प्राध्यापिकेची अनुभव गाथा आहे. ही कथा नायिका साहित्यातल्या स्थळांना आणि वास्तूंना भेट देण्यासाठी साम्राज्यवाद्यांच्या देशात जाते आणि पदोपदी शूद्र आणि शुल्लक असल्याचा अपमान सोसते. परतीच्या प्रवासात 'गड्या आपला देशच बरा' असे मनोमन ठरवून टाकते.म्हणून ही कथा वाचकाला राष्ट्रप्रेम शिकविणारी आहे. 'यारा' ही कथा एका दहशतवादी देशातील राष्ट्रीय पदक विजेत्या सायकल चॅम्पियनची आहे.! वडील हरविल्यानंतर कुटुंबावर देश सोडून जाण्याची वेळ येते आणि शेजारील देशात चोरून प्रवेश करताना रेफ्युजी म्हणून ती पकडली जाते. पुन्हा एकदा तुरुंगात तिला तिचा एक समुपदेशक म्हणून शोध लागतो. पुढे ती अतिरेकी आणि सरकार यांच्यामध्ये वाटाघाटी घडवून शांततेचे सर्व पुरस्कार मिळविते. ही कथा वाचताना मलाला युसुफझाईची आठवण वाचकाला झाल्याशिवाय राहत नाही.'आयडेनटीटी' ही या कथासंग्रहातील शेवटची कथा असून यामध्ये एकुलती एक कन्या ग्रॅज्युएट झाली म्हणून तिच्या हट्टासाठी तिला स्कुबा ड्रायविंगच्या ट्रेनिंगसाठी जातात आणि गंभीर अपघातामध्ये ती कमरेखालचे सेल्सेशन गमावून बसते. आई-वडिलांचे अथक प्रयत्न आणि तिच्या दोन पाळीव मित्रांमुळे ती पुन्हा पायावर उभी राहण्यापर्यंतचा एक हृदयस्पर्शी प्रवास लेखिकेने मोठ्या कलात्मकतेने उभा केलेला आहे. तिचे दोन मित्र ससा आणि कासव जे तिला जीवन जगायला प्रवृत्त करतात. म्हणजे लेखिका पुन्हा एकदा 'माणसापरास मेंढरं बरी' या उक्तीचा अनुभव वाचकांना या माध्यमातून करून देतात.एकूण ११ लघुकथांचा हा कथासंग्रह आहे. विविध आशयाच्या नव्या पायवाटा लेखिकेने निर्माण करून दिलेल्या आहेत. म्हणून सर्व वयोगटातील वाचकांना मी वाचनासाठी शिफारस करतो. शिवाय अभ्यासक्रमामध्येही या कथा समाविष्ट करण्यासारख्या आहेत. या कथा 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' आणि 'संघर्ष म्हणजेच जीवन' हे जीवनातील मर्म सहजपणे आपल्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करतात. हा कथासंग्रह पुस्तक स्वरुपात, किंडल ई-बुक स्वरुपात ॲमेझॉन या ई-कॉमर्स साइटवर उपलब्ध आहे. लवकरच हा संग्रह ऑडिओ बुकच्या रूपाने सुद्धा वाचकांसमोर येणार असल्याचे लेखिकेने म्हटलेले आहे.

**परीक्षण डॉ.वासुदेव उगले,**
**मराठी भाषा व वाङमय विभाग,**
**श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय,जालना.**

# भारतीय लष्कराने विशेष अभियान सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशत वादयांचा केला खात्मा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय जनता पक्षाने शहरातील सर्व जनतेला एकत्रित येण्याचे आवाहन करत छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुरुवारी (ता. ८) रोजी भारतीय लष्कराने विशेष अभियान सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशत वादयांचा केला खात्मा केल्याबद्दल फटाके फोडून, पेढे वाटून आनंद उत्सव साजरा केला. या वेळी भारतीय जनता पक्षाचे व्यापार आघाडी जिल्हाध्यक्ष श्रीकांत ( राजू ) मिनियार, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र बेंडकाळे, माजी सैनिक दडगू चव्हाण, शिवाजी पवार, देविदास व्हनाळे, माने, मासूलदार टेकाळे, किसान ब्रिगेड जिल्हाध्यक्ष भगत माळी,, युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष मोहन जाधव, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष सिद्धलिंग हिरेमठ, युवा मोर्चा धाराशिव जिल्हासचिव आकाश क्षीरसागर, बाळासाहेब गिरीबा, राजीव शिंदे, बाबुराव बेगमपुरे सह शहरातील विविध संस्था, संघटनेचे पदाधिकारी बहुसंख्य उपस्थित होते.

फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील शिवाजी चौकात भारतीय लष्कराने विशेष अभियान सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशत वादयांचा खात्मा केल्याबद्दल अभिनंदन करताना संस्था, संघटनांचे पदाधिकारी

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ मे २०२५

## डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अ‍ॅड.कल्पलता पाटील भारस्वाडकर, सचिव अ‍ॅड.धनंजय कुलकर्णी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी अभिनंदन केले. तसेच आज महाविद्यालयाच्या सभागृहात विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, पर्यवेक्षक माधुरी भावसार, डॉ. प्रभाकर गायकवाड, डॉ. रजनी सेनाड, डॉ. शोभा हनवते आदींची उपस्थिती होती.महाविद्यालयाने याही वर्षी गौरवशाली यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा ९१.६७ टक्के, कला शाखेचा ७९.६० टक्के, वाणिज्य शाखेचा ८१.४८ टक्के, एच एस व्ही सी ७१.४२ टक्के निकाल लागला आहे.महाविद्यालयातुन शाखा निहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी अनुक्रमे कला शाखा- कु.भार्गवी मोदी 93.83, कु.राधिका दैठणकर 87.17, कु.अमृता गायके 80.33, वाणिज्य शाखा- कु. निदा फिरदौस पटेल 94.67, कु.वर्षा शर्मा 87.83, कु.तोसामा सोनिया 86.00, विज्ञान शाखा- कु.विद्या गादिया ८८.५०, कु, मैथिली भालगावकर 72.17 , जिवेश यादव, एच. एस. व्ही.सी. - कु. हर्जॉग रिया ज्योती- 76.83, कु.अग्रवाल प्रियानी 75.83, कु.पाखरे अनिता 68.00, कु. गाडेकर पूजा तसेच 68.00 तसेच उन्नती उमरकर, भार्गवी मोदी,अर्पिता कदम,राधिका दैठणकर, हर्षराज परसोडे, ईश्वरी खेळवणे या विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात 100 पैकी 100 गुण मिळवले आहेत. यावेळी महाविद्यालयातून विषय निहाय सर्व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचाही स्मृती चिन्ह व बुके देऊन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई व विषय शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षिका प्रा.माधुरी भावसार, डॉ. शोभा हनवते, डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा.मंगल मोरे, डॉ शीला जिरे,प्रा.रवींद्र परभाणे, डॉ . रजनी सेनाड, प्रा.सिद्धार्थ शिंदे, प्रा.शंकर विधाते, प्रा.ज्योती मंठाळकर, प्रा.ज्योत्स्ना लचूरे,प्रा.नीता गोरे, प्रा.जयश्री वाघमारे इत्यादींची उपस्थिती होती. तसेच पालक व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय आणि रासायनिक तंत्रज्ञान संस्था यांच्यात सामंजस्य करार



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाचा रसायनशास्त्र विभाग आणि शासकीय रासायनिक तंत्रज्ञान संस्था, मराठवाडा कॅम्पस, जालना यांच्यात अंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत रसायनशास्त्रातील ज्ञान अध्ययावत ठेवण्यासाठी शिक्षण, संशोधनासोबतच शिक्षक आणि विद्यार्थी यांचे आदान प्रदान करण्याचे ठरले आहे. या सामंजस्य करारावर रसायनशास्त्र विभागप्रमुख, प्रा. डॉ. ओमप्रकाश चव्हाण आणि रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रा. डॉ. एस. टी. मस्के यांनी सह्या केल्या. यावेळी आयसीटी च्या माजी संचालिका श्रीमती स्मिता लेले आणि बारवाले महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. कल्याण कुंभार यांची उपस्थिती होती.या शैक्षणिक आदान प्रदान कराराबद्दल दोन्ही बाजूकडील समन्वयक यांचे महिको रिसर्च फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बारवाले, सचिव श्रीमती उषा झेर, संस्थेचे सर्व संचालक आणि प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी अभिनंदन केले आहे. भविष्यात विविध प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी निर्माण करून द्याव्यात आणि येथील विद्यार्थ्यांने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले नाव उज्वल करण्यासाठी या दोन्ही संस्थांनी प्रयत्न करावे ही अपेक्षा व्यक्त केली. रसायनशास्त्राचे महत्त्व अनमोल आहे. ती केवळ एक वैज्ञानिक शाखा नाही, तर आपल्या दैनंदिन जीवनाचा आणि प्रगतीचा आधारस्तंभ आहे. आज आपण जी अनेक जीवनरक्षक औषधे वापरतो, ती रसायनशास्त्राच्या ज्ञानातूनच विकसित झाली आहेत. रोगांचे निदान आणि उपचारांसाठी नवीन रसायने आणि औषधे शोधणे हे रसायनशास्त्रज्ञांचे महत्त्वाचे कार्य आहे. वैद्यकीय उपकरणांमध्ये वापरले जाणारे अनेक पदार्थ, जसे की कृत्रिम अवयव, शस्त्रक्रिया उपकरणे आणि इमेजिंग एजंट्स, रसायनशास्त्राच्या प्रगतीमुळेच शक्य झाले आहेत. शेतीत अधिक उत्पादन घेण्यासाठी वापरली जाणारी खते आणि पिकांचे संरक्षण करणारी कीटकनाशके रसायनशास्त्राच्या आधारावरच तयार केली जातात.अन्नाची गुणवत्ता, चव आणि ते अधिक काळ टिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रक्रिया आणि रसायने रसायनशास्त्राचाच भाग आहेत. प्लास्टिक, रंग, सिमेंट, धातू, वस्त्रे, सौंदर्यप्रसाधने आणि इतर अनेक प्रकारची उत्पादने रसायनशास्त्राच्या ज्ञानाशिवाय तयार करणे शक्य नाही. रसायनशास्त्रज्ञ सतत नवीन गुणधर्म असलेल्या सामग्रीचा शोध घेत असतात, ज्यामुळे तंत्रज्ञानात आणि उत्पादनांमध्ये सुधारणा करता येतात. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि इतर अपारंपरिक ऊर्जा स्रोतांच्या विकासात रसायनशास्त्राची महत्त्वाची भूमिका आहे. ऊर्जा साठवणुकीसाठी नवीन बॅटरी आणि तंत्रज्ञान विकसित करणे हे रसायनशास्त्राचेच कार्य आहे. प्रदूषण नियंत्रणात आणि पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी रसायनशास्त्र आवश्यक आहे. कचरा व्यवस्थापन, जलशुद्धीकरण आणि हानिकारक रसायनांचे विघटन करण्यासाठी रासायनिक प्रक्रियांचा उपयोग केला जातो. आपण रोज वापरतो त्या अनेक वस्तू, जसे की साबण, डिटर्जंट, टूथपेस्ट आणि सौंदर्य उत्पादने, रसायनांपासूनच बनवलेली असतात. जंतुनाशके आणि स्वच्छता उत्पादने आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करतात आणि ती रासायनिक अभिक्रियांच्या आधारावरच कार्य करतात.

## श्री संत जनार्दन स्वामी उच्च माध्यमिक विद्यालय एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत उज्ज्वल निकालाची ची परंपरा कायम राखत तालुक्यात प्रथम



**खुलताबाद (प्रा. योगेश रावते)** वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) चा एच एस सी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी-मार्च -2025 चा बारावीचा निकाल जाहीर झाला असून कला व विज्ञान दोन्ही शाखेचा निकाल 100% लागला असून दरवर्षी प्रमाणे या वर्षीही उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. कला शाखेतून प्रथम क्रमांक - कु.जंघाळे चंचल बालचंद 83.67%, व्दितीय क्रमांक - कु.गुमलाडू प्रियंका सुप्पडसिंग 81.17%, तृतीय क्रमांक - कु.लाटे पूजा बाळू ८०.२३ तर विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक कु.बागुल समृद्धी रमेश ८६.१७%, द्वितीय क्रमांक- कु.डेडवाल कल्याणी उमराज 82.83%, तर तृतीय क्रमांक- पेंढारे सुमित मनेष 82.33% घेऊन यश संपादन केले. बारावी कला व विज्ञान शाखेत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे गुरुजनांचे संस्थेचे अध्यक्ष जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज, तसेच संस्थेचे सचिव महंत 108 स्वामी सेवागिरीजी महाराज व प्राचार्य दिनकर ढोबळे यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी गौरव करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ मे २०२५


## नाशिकमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस : शेतकऱ्यांना फटका, पिकांचे मोठे नुकसान



**नाशिक** : राज्यात सध्या हवामानातील मोठे बदल दिसून येत आहेत. काही भागांत तीव्र उन्हाचा त्रास जाणवत असताना, काही ठिकाणी अवकाळी पावसाचा जोर अनुभवायला मिळत आहे. या बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांनाच बसत असून त्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे.

नाशिकमध्ये अचानक वादळी वाऱ्यांसह जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. शहरासह ग्रामीण भागांमध्येही विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. या अचानक झालेल्या हवामान बदलामुळे नागरिकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. अवकाळी पावसामुळे नाशिकमधील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांसाठी नाशिक जिल्ह्याला येलो अलर्ट जाहीर केला आहे.

दरम्यान, राज्याच्या इतर काही भागांत उष्णतेचा कडाका प्रचंड वाढला आहे. अनेक ठिकाणी तापमान 40 अंश सेल्सिअसच्या पुढे गेले असून नागरिक त्रस्त झाले आहेत. या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कृषी आणि आपत्कालीन व्यवस्थापन विभागांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान, प्रशांत महासागरातील समुद्री पाण्याचे तापमान व तेथील हवेचे दाब व मान्सून आगमनासंबंधीच्या इतर पाच वातावरणीय घडामोडी पाहता मान्सून देशाच्या दक्षिण टोकावर म्हणजे केरळात त्याच्या सरासरी तारखेच्या चार दिवस अगोदर म्हणजे २७ मे ह्या प्रावधानिक तारखेला दाखल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मागील वर्षी मान्सूनचा केरळात प्रवेश ३० मे रोजी अपेक्षित होता, मात्र तो प्रत्यक्षात ३१ मे रोजी झाला. त्यानंतर महाराष्ट्रात मान्सूनची अरबी समुद्रावरील शाखा १० ते ११ जूनदरम्यान दाखल झाली, मात्र त्यावेळी मान्सूनी प्रवाहात आवश्यक ती ताकद नव्हती.

यंदा हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २७ मे या तारखेच्या ४ दिवसांच्या फेऱ्यात म्हणजेच २३ ते ३१ मे या कालावधीत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता आहे.

## गावकऱ्यांच्या तहानेसाठी सोडले पिकावर पाणी सेवानिवृत्त शिक्षकाची अशीही दर्यादिली!



**दिग्रस : (महेश मुंढे)** पाण्याविना गावाची कल्पनाही करणे केवळ अशक्य आहे. पाणी हे मानवाचं जीवन तसंच ते गावाचंही! पण दुदैवाने अजूनही गावांच्या, शहरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न सुटलेला नाही. उलट ही तहान वर्षागणती वाढतच आहे. दिग्रस शहरात आणि तालुक्यातही यावर्षी भयंकर पाणी टंचाई जाणवत आहे. पाणी टंचाईच्या झळा जसंजसे ऊन वाढत आहे तसतशा अधिक तीव्र होत आहे. एप्रिल महिन्यातच तहानेने गावं, वाड्या, वस्त्या व्याकुळ झाल्या आहेत. ही तहान भागवण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरलं असलं तरी गावातील काही दानशूर, कर्तव्यनिष्ठ माणसं आपल्या विहिरी गावासाठी खुल्या करून लोकांना पाणी पाजत आहे. मानवतेचा हा ओलावा एवढ्या प्रचंड उन्हातही सुखद धक्का देणारा आहे. दिग्रस तालुक्यातील डेहणी हे गाव सध्या भीषण पाणी टंचाईचा सामना करीत आहे. उशाला असलेलं धरण, गावात असणारी कोट्यावधींची योजना, तालुक्यातील सर्वात मोठी ग्राम पंचायत आपली तहान भागवू शकत नसल्याचा तीव्र संताप गावकरी व्यक्त करत आहेत. येथील पाणी पुरवठा योजनेवर तब्बल सव्वा कोटी रुपयांचा निधी खर्ची पडला मात्र योजनेतून सव्वा लिटर पाणी गावाला मिळाले नाही. गावकऱ्यांच्या हा संताप, राग आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन येथील एका सेवानिवृत्त शिक्षकाने आपली विहिर लोकांसाठी 24 तास खुली करून दिली आहे. त्याला मानवतेची, माणुसकीची आणि आपुलकीची किनार आहे. आपली विहिर अधिग्रहित न करता,पाण्याचा कोणताही मोबदला आपल्याला नको अशी अतिशय मानवीय भूमिका त्यांनी घेतली.विहिरीसोबतच स्वतःचा मोटार पंप,पाईप आणि वीज उपलब्ध करून दिली आहे. हे करतांनाच आपली उन्हाळी पिके त्यांना गुंडाळून ठेवावी लागली. तसे दरवर्षी ते उन्हाळी भुईमूग घेतात.यावर्षी केलेल्या नियोजनानुसार ते भेंडी,बरबटी, वांगी ही पिके घेणार होते.मात्र गावातील भीषण टंचाई पाहून त्यांचं मन वितळलं.गावाची तहान भागविण्यासाठी त्यांनी पिके घेण्याचे थांबवून सरळ विहिरीतील पाणी ग्राम पंचायत विहिरीत सोडले.आणि गावकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले.दिवाकर इहरे यांची डेहणी गावालगतच वडिलोपार्जित साडे तीन एकर शेती आहे. गरजेच्या वेळी चार घोट पाणी विनासायास लोकांच्या कामी पडलं यापेक्षा मोठा मोबदला तो काय असणार? असा उलट प्रश्न ते आपल्याला करतात. गावच्या सरपंच सपना राठोड, सामाजिक कार्यकर्ते बबलू राठोड, ग्राम विकास अधिकारी गुलाब चतुर आणि काही गावकऱ्यांच्या विनंती वरून आपण विहिर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. यापूर्वीही त्यांनी पाणीटंचाईसाठी विहिर उपलब्ध करून दिल्याचे गावकरी कृतज्ञतापूर्वक सांगतात.

## राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर विरोधकांनी राजकारण करू नका: शिवसेना नेत्याचा काँग्रेसला इशारा



**मुंबई** : पहलगाम हल्ला आणि त्यानंतर झालेल्या ऑपरेशन सिंदूर वरुन आता सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. या प्रकरणात युद्ध बंदीच्या घोषणेनंतर काँग्रेसच्या नेत्यांनी सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. यावरुन एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते मिलिंद देवरा यांनी पलटवार करत विरोधकांना इशारा दिला आहे.

शिवसेना नेते मिलिंद देवरा यांनी भारत-पाकिस्तान दरम्यान झालेल्या करारावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, "शिवसेना पक्षाच्या वतीने मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे, शूर भारतीय सैन्याचे आभार मानतो ज्यांनी कोणतीही किंमत लागली तरी भारताचे संरक्षण केले आणि या संघर्षात जीव गमावलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करतो."

या संबंधी वृत्त संस्थेची बोलताना देवरा म्हणाले की, "परक्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणात हस्तक्षेप करण्याचे दिवस गेले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील हे 'नवीन भारत' आहे. भारत आता पूर्णपणे सज्ज आहे, सक्षम आहे आणि दहशतवाद्यांनाच नव्हे तर दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या देशांनाही सडेतोड उत्तर देण्यास तयार आहे. जर शेजारी देश पुन्हा अशा प्रकारचा धाडस करण्याचा प्रयत्न करतील, तर त्यांना काय परिणाम भोगावे लागतील, याची जाणीव त्यांना आहे."

## राजकोटावर शिवाजी महाराजांचा दिमाखदार पुतळा

**सिंधुदुर्ग** : मालवणच्या ऐतिहासिक राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य पुतळ्याचे लोकार्पण आज, ११ मे २०२५ करण्यात आले आहे. या भव्य सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, तसेच राज्य मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि नितेश राणे यांची उपस्थिती होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्याच स्वाभिमानाने आणि अधिक भव्यतेने उभारला आहे. मागच्या काळात ज्यावेळी दुर्दैवी घटना झाली होती, त्यावेळी आमच्या सरकारने निर्धार केला होता की विक्रमी वेळेत हा पुतळा या ठिकाणी आम्ही पुन्हा प्रस्थापित करू. आज त्याचे पूजन आम्ही केले आहे. मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिनंदन करतो. सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन मंत्री रवींद्र चव्हाण असतील किंवा आताचे मंत्री शिवेंद्र भोसले असतील यांनी अतिशय वेगाने हे काम केले आहे. त्यासोबत सुतार साहेब यांनी अतिशय उत्तम पुतळा तयार केला आहे. त्याच्यासोबत आयआयटीचे विद्यार्थी होते, जे जे स्कूल ऑफ आर्ट्सचे विद्यार्थी होते. इथे कोकणात वेगवेगळे वादळ येतात, त्या सगळ्या वादळांचा अभ्यास करून हा पुतळा राहू शकेल अशी रचना करण्यात आली आहे. जवळपास ९१ फूटांचा हा पुतळा आहे. ज्यात १० फूट पेडेस्ट्रॉल आहे. देशातील महाराजांचा हा सर्वात उंच पुतळा म्हणून याकडे पाहता येईल. किमान शंभर वर्ष कुठल्याही प्रकारच्या वातावरणात हा पुतळा टिकेल. तसेच १० वर्ष देखभालीची जबाबदारी ज्यांनी पुतळा तयार केलेला आहे, त्यांच्याकडे देण्यात आली आहे. जी काही दुर्दैवी घटना मागे घडली होती, तेव्हा आम्ही निर्धार केला होता की कुठल्याही परिस्थितीत महाराजांना साजेसे स्मारक तयार करण्यात येईल.

गेल्या वर्षी देखभाल योग्यरीत्या न केल्याने गंज आणि चुकीच्या वेल्डिंगमुळे पुतळा कोसळल्याची घटना घडली होती, ज्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. या प्रकरणाबाबत खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागितल्याने संपूर्ण देशाचे लक्ष या घटनेकडे वेधले गेले होते. त्यामुळे नव्या पुतळ्याची उभारणी भावनिकदृष्ट्याही आणि राजकीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

प्रख्यात शिल्पकार राम सुतार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे हे शिल्प घडवले असून, त्यांच्या सुपुत्र अनिल सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पुतळा साकारण्यात आला आहे. तलवारीच्या टोकापर्यंत या पुतळ्याची एकूण उंची ८३ फूट आहे.